५/१८५

मिरा – भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

जा.क्र. : मनपा/आस्था/३९९/२७५४/२००३/०४ दिनांक :-३/१०/२००३.

## आदेश

प्रति,
श्री. नागु रामा इरकर.
मु. नाबोली गिरीज
पो. वसई (प.) ता. वसई जि. ठाणे.

विषय :- लिपिक या पदावर नेमणुकीबाबत.

आपणांस कळविण्यांत येते की, आपली निवड मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक या पदाकरीता झालेली आहे.

करीता आपली नियुक्ती लिपिक या पदावर रु.३०५०-७५-४५९०. या वेतनश्रेणीत आदेशाचे दिनांकापासून खालील अटीशर्तीनुसार करण्यांत येत आहे.

अटीशर्ती :-

१) आपली नियुक्ती १ वर्षाचे परिविक्षाधिन कालावधीकरीता करण्यांत येत असून परिविक्षाधिन कालावधीमध्ये आपले काम समाधानकारक असल्यास पुढे कायम करण्यांत येईल.

२) आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत नेमणूकीचे पदावर हजर होणे बंधनकारक राहील. हजर न झाल्यास आपल्याला सेवेची गरज नाही असे गृहीत धरून नेमणूक रद्द करण्यांत येईल.

३) कामावर हजर होतेवेळी दोन प्रतिष्ठीत व्यक्तींचे दाखले सादर करणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक पात्रता, वयाचा दाखला व जातीचे प्रमाणपत्र यांची मूळ प्रमाणपत्रे व साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

४) जात पडताळणी विभागाकडून जातीचे प्रमाणपत्र तपासल्यानंतर खोटे आढळल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.

५) कामावर हजर झालेपासून दोन महिन्यांचे आत जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील शारीरिक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६) नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता (एम.एस.सी.आय.टी.) प्राप्त करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपली सेवा समाप्त होईल.

(स्वाक्षरी)
आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

जा. क्र. मनपा/आस्था/२४५३/२५४७/२००६-०७
दिनांक :- ३०/३/२००७

संदर्भ :-
१) मा. महासभा ठराव क्र. २९ दि. १२/८/२००५
२) शासन निर्णय क्र. मिभामपा-१६०६/१२३४/प्र.क्र.१७५/०६/नवि-२८, दि.२१/८/२००६.
३) मा. महासभा दि.१७/११/२००६ ठराव क्र. ६७.
४) मा. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांना जा.क्र. मनपा/आस्था/१५००/१८०७/२००६-०७ दि.३०/११/२००६ अन्वये पाठविलेले पत्र.
५) मा. स्थायी समिती सभा दि.१८/१/२००७ ठराव क्र. १७१.
६) पदोन्नती निवडसमिती बैठक दि.२०/३/२००७ मधील निर्णय.

## // आदेश //

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रशासकिय कामांची निकड लक्षात घेऊन खालील कर्मचारी / अधिकारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर व वेतनश्रेणीत आदेशाच्या दिनांकापासून तदर्थ पदोन्नती देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नांव | पदोन्नतीचे पद | प्रवर्ग | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नागेश रामा इरकर | उद्यान अधिक्षक | खुला | ५५००-१७५-९००० |

**अटीशर्ती :-**

१) वरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नती या पदाचे सेवाप्रवेश नियम शासनाकडून अंतिम होण्याच्या अटींच्या अधिन राहतील.
२) अंतिम सेवा प्रवेश नियमांतील अटी व शर्तींची पुर्तता संबंधित अधिकाऱ्यांचे बाबतीत पूर्ण केली पाहिजे. अन्यथा, अशा तदर्थ पदोन्नत्या आपोआप संपुष्टात येतील.
३) उद्यान अधिक्षक यांनी उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग प्रमुख यांच्या अधिपत्याखाली काम करावे.
४) समान वेतनश्रेणीवर कोणत्याही पदावर व कोणत्याही विभागात काम करणे बंधनकारक राहील.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री. नागेश रामा इरकर,
लिपिक

प्रत :-
१) उप-आयुक्त (मु.)
२) मुख्यलेखापरीक्षक
३) निवडनस्ती, आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/3632/2021-22

दि. 11 / 03 /2022

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उद्यान अधिक्षक या पदावर कार्यरत अधिकारी यांना उप मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि. 01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25/11/2021.
7. मा. विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.09/03/2020.

**<u>आदेश</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उदयान अधिक्षक या संवर्गातील अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.07 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 06 वरील शासन निर्णयास अनुसरुन उदयान अधिक्षक या संवर्गातील खालील अधिकारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. नागेश विरकर<br>S-13 35400-112400 | उद्यान अधिक्षक | उप मुख्य उद्यान अधिक्षक | खुला | S-15 41800-132300 |
| 2. | श्री. हंसराज मेश्राम<br>S-13 35400-112400 | उद्यान अधिक्षक | उप मुख्य उद्यान अधिक्षक | खुला | S-15 41800-132300 |

अटीशर्ती :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. सदर पदोन्नती शासन मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
3. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

4. पदोन्नत अधिकाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि.12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.
5. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.
6. सद्य:स्थितीत उद्यान अधिक्षक या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.
7. उप मुख्य उद्यान अधिक्षक या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
8. उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल.
9. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,1981 मधील नियम 11(1)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13(अ)(1)(2)(ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.
10. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा.न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व
1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती